# प्रेसनोट

दि.०१/०८/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | पाथर्डी पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.८२६/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)सतिष रखमाजी धरम, वय–४० वर्ष, तलाठी, सजा–आडगांव अतिरिक्त कार्यभार सजा–तिसगांव, वर्ग–३, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर रा.मिरी, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर.<br>२)अक्षय सुभाष घोरपडे (खाजगी इसम), वय–२७ वर्ष, धंदा–शेती, रा.शिंगवे केशव, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दि.३१/०७/२०२५ रोजी लेखी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे वडीलांचे नावे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजुर झाले आहे. सदर घरकुलाचा पाया भरण्याच्या कामकाजा करता मुरुम व जाडसर वाळूच्या दोन गाडया तक्रारदार यांनी नदीपात्रातुन आणून घरकुलाच्या बांधकामाच्या ठिकाणी खाली केलेल्या होत्या. सदर मुरुम आणण्याकरीता त्यांनी त्यांचे चुलते व मित्र यांच्या जेसीबी व ट्रॅक्टरचा वापर केलेला होता. यातील लोकसेवक तलाठी धरम व नायब तहसिलदार सानप, तहसिल पाथर्डी यांनी रात्रीच्या वेळी त्या ठिकाणी येऊन पाहणी केली होती. त्यानंतर आरोपी लोकसेवक सतिष धरम, तलाठी हे तक्रारदार यांना म्हटले आहे की, तुम्ही गौण खनिजाची अवैध वाहतूक केलेली आहे. तुमच्या वाहनावर व तुमच्यावर कारवाई होऊ दयायची नसेल तर नायब तहसिलदार यांना पन्नास हजार रुपये दयावे लागतील असे म्हणुन आरोपी लोकसेवक तलाठी धरम यांनी तक्रारदार यांच्या वाहनावर व मुरुमांच्या ढिगावर अवैध गौण खनिज वाहतुकीचे कारवाई न करण्याच्या मोबदल्यात ५०,०००/– रुपये लाचेची मागणी केलेली आहे. सदरची लाच रक्कम तक्रारदार यांच्याकडून आरोपी लोकसेवक धरम यांनी स्वत: स्वीकारुन ती लाच रक्कम खाजगी इसम घोरपडे यांच्याकडे दिली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर